**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**
**सभावृत्तांत**

**दिनांक - ०२/११/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ०२/११/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा. मा.गायकवाड निर्मला मनोज - **अध्यक्षा**
२) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण -
३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४) मा. लक्ष्मण धोंडू उंडे -
५) मा.साधना सचिन तापकीर – स्विकृत सदस्या

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी, श्री. एस. एच. भोसले- प्र.प्रशासन अधिकारी, मा.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता (विद्युत),मा.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.संजय भोसले –कार्यकारी अभियंता ((ज.नि.),) श्री.थोरात – श्री.लांडे बी.पी.-उपअभियंता- विद्युत, श्रीम.शिनकर पी.पी.उपअभियंता (स्थापत्य), श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य) श्री.वहीकर एस.एस.प्र.उपअभियंता (पाणीपुरवठा) , श्री.व्ही.के.जाधव – उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.गवळी धनंजय - उपअभियंता (ज.नि.), श्री.प्र.रा.तावरे – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अ.व.गुमास्ते - प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.कोतकर पी. क.अभियंता, श्री.बेळगांवकर एस.एस.- क.अभियंता, श्री.कुतवळ एस.यु.- क.अभियंताश्री.ठोकळे संदीप.- क.अभियंता (ज.नि.), श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.निखील फेंडर-क.अभियंता (स्थापत्य उद्यान) श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिक्रमण), श्री.बगाडे एस.व्ही. – सहा.उद्यान अधिक्षक, श्री.डी.डी.सटाणे- उद्यान सहाय्यक, श्री.जाधव आर.डी.- झो.नि.पू. विभाग, श्री.एच.जे.म्हेत्रे – उद्यान सहाय्यक, श्री.कार्ले बी.के.-मुख्य लिपिक, श्री.सावंत व्ही.एल.माध्य.विद्यालय, श्री.साळुंके जे.जे.- मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक, -------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा. विकास डोळस अनुमोदक- मा. बारसे प्रियांका प्रविण

**मा.विकास डोळस** – आज दिनांक २/११/२०१८ रोजीच्या इ प्रभाग समितीच्या अध्यक्ष पदाचा मान **मा.निर्मला गायकवाड** यांनी स्विकारण्यात यावा.

-------

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.अध्यक्षा -** आज दिनांक २/११/२०१८ रोजीच्या इ प्रभाग समितीच्या अध्यक्षा पदाचा मान दिल्या बद्दल सर्व सन्मा. सदस्यांची मी आभारी आहे. तसेच एनवेळचे विषय दाखल करुन घेऊन सदरची सभा गणसंख्येअभावी १५ मिनिटे तहकूब करुन. सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करणेत येत आहे.

-----

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

**विषय क्रमांक - १**. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता नव्याने पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत. पत्र क्र. श्रीभैवा/०७/कावि/५६/२०१८ दिनांक ३१/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** २.बहुउद्उद्देशीय इमारत (शहिद कर्नल संतोष महाडीक) विनामुल्य भाडेतत्वावर ११ महिन्याच्या करारानुसार मिळणेबाबत.मा.लक्ष्मण धोंडू उंडे, यांचे दिनांक २/११/२०१८ चे पत्र.

-------

अ) दिनांक ०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०५/१०/२०१८ व ८/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले

------

ठराव क्रमांक - **२१** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०२/११/**२०१८

सूचक- मा. अनुमोदक – मा.

संदर्भ - प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय, पैसे द्या व वापरा या तत्वावर देणेबाबत. स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/१११५/२०१८, दिनांक २३/१०/२०१८ चे पत्र.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - **२२** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०२/११/**२०१८

सूचक- मा.विकास डोळस अनुमोदक – मा.प्रियांका बारसे

संदर्भ - नळ कनेक्शन बाबत मा.भिमाताई फुगे, अध्यक्षा, इ प्रभाग समिती यांचे दिनांक २४/१०/२०१८ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ५ व ७ मध्ये दिघीफाटा ते सॅण्डविक कॉलनी, आदर्श शाळेपर्यंत असलेली पाण्याची पाईप लाईन पाणी कमी पडत असल्याने एक पाईप लाईन जादा टाकण्यात आलेली आहे. काही नळ कनेक्शन नवीन पाईपवर घेण्यात आले आहेत. व काही नळ कनेक्शन हे जुन्या पाईप लाईनवर आहे. परंतू जुन्या

पाईप लाईनवर नवीन पाईप लाईन असल्यामुळे जुने नळ कनेक्शन पुर्णपणे बंद केलेले नाही त्यामुळे जमिनीखाली मोठया प्रमाणावर पाण्याची गळती होत असल्याने नागरीकांना पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने नागरीकांच्या तक्रारी वाढतात. तरी पाणीपुरवठा विभागाने ते दोन्ही पाईप लाईनची तपासणी करुन होत असलेली पाणी गळती तात्काळ बंद करण्यात यावी. सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

-------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०२/११/२०१८

सूचक- मा. विकास डोळस अनुमोदक – मा. लक्ष्मण धोंडू उंडे

संदर्भ- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता नव्याने पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत...
पत्र क्र. श्रीभैवा/०७/कावि/५६/२०१८ दिनांक ३१/१०/२०१८ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी व हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय, चिंचवड या २ वाचनालयानां महाराष्ट्र शासनाचा “ब” दर्जा प्राप्त असुन त्यांना अनुदान प्राप्त होत असल्याने दर वर्षी पुस्तके/ग्रंथ, दिवाळीअंक खरेदी करणे आवश्यक आहे. वाचकांच्या व सभासदांच्या आवडीनुसार कथा, कादंब-या, ललित, ऐतिहासिक, विनोदी, आरोग्य, काव्य, धार्मिक, विषयाच्या पुस्तकांची/ दिवाळीअंकांची खरेदी करणेत येते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रशासकिय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने प्रशासनाकडिल जा.क्र. सावा/02/ कावि/717/2017 दि. 29/09/2017 सार्वजनिक वाचनालये व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलीक क्षेत्रानुसार भोसरी येथील श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परिक्षा केंद्र “इ” क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणेबाबतचा आदेश निर्गत करण्यात आलेला आहेत. त्यानुसार “इ” क्षेत्रीय कार्यालया मार्फत सार्वजनिक वाचनालयाकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता “ पुस्तके व नियतकालिके खरेदी ” या लेखाशिर्षावर सुधारित तरतुद र.रु. ३,००,०००/- इतकी रक्कम असुन त्यातून श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परिक्षा केंद्र करीता ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे व नियातकालिके खेरदी करण्यात येतात.

“इ” क्षेत्रीय कार्यालया मार्फत श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, करीता कोटेशन नोटीस क्र. १ जा.क्र.भैसावा/७/कावि/४९/२०१८, दि.२२/१०/२०१८ अन्वये प्रसिध्द करून सोबतचे प्रपत्र “अ” नुसार दरपत्रक मागविले असता ५ पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले असून पूनम एजन्सी, अप्पा बळवंत चौक, पुणे यांनी 25% सुट दिली आहे. त्यानुसार पूनम एजन्सी, अप्पा बळवंत चौक, पुणे यांचेकडुन अटी व शर्ती नुसार श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता ६८ दिवाळीअंक खरेदी करणेकामी 25% सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेले आहे. सदरचा खर्च “ पुस्तके व नियतकालिके खरेदी ” या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे.

तरी पूनम एजन्सी, अप्पा बळवंत चौक, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता ६८ दिवाळीअंकाच्या छापिल किमतीवर 25% सुट देवून र.रू.१०,१३०/- ( अक्षरी र.रू. दहा हजार एकशे तीस फक्त ) ची पुस्तके खरेदी करावयाच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०२/११/२०१८

सूचक- मा.लक्ष्मण धोंडू उंडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - बहुउद्उद्देशीय इमारत (शहिद कर्नल संतोष महाडीक) विनामुल्य भाडेतत्वावर ११ महिन्याच्या करारानुसार मिळणेबाबत.मा.लक्ष्मण धोंडू उंडे, यांचे दिनांक २/११/२०१८ चे पत्र.

माजी सैनिक विकास संघ, महाराष्ट्र राज्य दिघी या संस्थेने २०१३ पासून वरील विषयानुसार माजी सैनिकांच्या विकासासाठी एका कार्यालयाची मागणी केलेली होती. आमच्या विनंतीस मान देऊन सदर इमारत बांधुन पुर्ण झालेली आहे. सदर इमारतीमधून २ मजले आम्हास विनाशुल्क भाडेतत्वावर देण्यासाठी मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झालेले आहे. आम्ही ३० वर्षाच्या कराराने मागणी करीत आहोत परंतू सध्या कार्यालयाचा व्याप वाढल्याने आम्हाला ११ महिन्याच्या कराराने विनाशुल्क भाडेतत्वावर देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

**मा. अध्यक्षा -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
निर्मला मनोज गायकवाड
इ प्रभाग समिति
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/३१७/२०१८
दिनांक- २७/११/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

-------

**दिनांक- शुक्रवार दिनांक २/११/२०१८ सकाळी ११.०० वा. झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे –** प्रभाग क्र. ५ मधील सखुबाई गवळी उद्यानाजवळील शौचालय पैसे दया व वापरा या तत्वावर दिले तर स्वच्छता होणार नाही. तसेच याबाबत अजून कोणाला विचारले का? अर्ज कोणाचे व किती आले. तसेच पेसे देऊन लोक येतील का?

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी)** - मे.सुविधा इंटरनॅशनलसोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन या संस्थेस दुरुस्तीसाठी ३० वर्षे करारनामा करुन देण्यात येणार आहे. या संस्थेचे केअर टेकर आहे. ती संस्था स्वत: लक्ष देणार आहे. त्यासाठी सुरक्षारक्षक नेमणे आवश्यक आहे. सखुबाई गवळी उद्यानाजवळील ठिकाणी व्यापारी लाईन आहे. त्यामुळे पैसे दया आणि वापरा या तत्वावर चालू शकते. जर नाही चालले तर आपण त्यांचेकडून काढून घेऊ.

**मा.प्रियांका बारसे –** त्या संस्थेबरोबर करारनामा करुन घ्या.

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी) –** करारनामा आपल्या बाजूने होणार आहे. भोसरी पुलाखाली जे सुलभ शौचालय स्थापत्य विभागाने बांधले आहे. आमच्याकडे कोणाचा अर्ज प्राप्त झालेला नाही.

**मा.प्रियांका बारसे –** अजून काही संस्थेचे अर्ज येऊ दया.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – स्वच्छ सर्वेक्षण २०१९ च्या अनुषंगाने अत्याधुनिक पध्दतीने स्थापत्य विभागाने शौचालय बांधले आहे. हे शौचालय वेगळया प्रकारचे आहे. देखभाल दुरुस्तीसाठी दिले आहे. त्या ठिकाणी ए.सी बसविणेत येणार आहे. पेपर नॅपकीनच्या सुविधा असतील हे सर्व त्या ठेकेदाराने करायचे आहे.

**मा.प्रियांका बारसे –** याबाबत जाहिरात का दिली नाही?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** ती संस्था स्वत:च पैसे दया व वापरा या तत्वावर करारनामा करण्यास तयार झाली.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - प्रभाग क्रमांक ५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे नामकरण करणे बाबात दिनांक ०७/१२/२१०७ चे पत्रान्वये इ क्षेत्रीय (प्रभाग समिती) मासिक सभेत दिनांक ०७/१२/२१०७ रोजी एनवेळचा विषय मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने दाखल करुन घेण्यात आला होता. सदरचे सभेत प्रभाग क्र.०५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्याबाबत ठराव क्रमांक २१ दिनांक ०७/१२/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. सदरचा ठराव दिनांक ०४/०१/२०१८ चे मासिक सभेत कायम करण्यात आला आहे. तथापि प्रभाग क्र.०५ अ चे नगरसेवक श्री.सागर बाळासाहेब गवळी यांनी दिनांक ०७/०२/२०१८ चे पत्रान्वये सदरचे बॅडमिंटन हॉलचे नावात फेरबदल करावयाचा असलेने नाव देण्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये असे कळविले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ चे १ (र) अन्वये सदर विषयाबाबत मतदान करुन निर्णय घेणेत येईल.

**मा.प्रियांका बारसे –** कै.सु.ना.बारसे हे कोणी दरोडेखोर नव्हते. त्यांनी चांगले संस्कार दिले आहेत. तसेच दिवाळीमध्ये लेजर शो.चालू होईल का? तसेच सगळीकडे लाईटची व्यवस्था करणे. संध्याकाळी राउंड घेणे पिवळया लाईटपेक्षा Led लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

**मा. साधना तापकीर – स्विकृत सदस्य –** प्रभाग क्रमांक ३ च-होली मध्येचौकांमध्ये सिग्नलची व्यवस्था करणे. चहोली येथील पाण्याची जुनीटाकी काढण्यात यावी. तसेच च-होली येथे भयंकर मच्छर झाले आहेत त्यामुळे धूर फवारणी करण्यात यावी.

यानंतर उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

**मा.निर्मला गायकवाड** - मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**
**सभावृत्तांत**

ठराव क्रमांक - **२४** विषय क्रमांक- ४

दिनांक- - **०२/११/**२०१८

सूचक- मा.लक्ष्मण धोंडू उंडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - बहुउद्उद्देशीय इमारत (शहिद कर्नल संतोष महाडीक) विनामुल्य भाडेतत्वावर ११ महिन्याच्या करारानुसार मिळणेबाबत.मा.लक्ष्मण धोंडू उंडे, यांचे दिनांक २/११/२०१८ चे पत्र.

माजी सैनिक विकास संघ, महाराष्ट्र राज्य दिघी या संस्थेने २०१३ पासून वरील विषयानुसार माजी सैनिकांच्या विकासासाठी एका कार्यालयाची मागणी केलेली होती. आमच्या विनंतीस मान देऊन सदर इमारत बांधुन पुर्ण झालेली आहे. सदर इमारतीमधून २ मजले आम्हास विनाशुल्क भाडेतत्वावर देण्यासाठी मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झालेले आहे. आम्ही ३० वर्षाच्या कराराने मागणी करीत आहोत परंतू सध्या कार्यालयाचा व्याप वाढल्याने आम्हाला ११ महिन्याच्या कराराने विनाशुल्क भाडेतत्वावर देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९